# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मीरा-भाईंदर,वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

प्रेसनोट क्रमांक :- ३१९ दिनांक :- १६/११/२०२१

## अनधिकृतरित्या वास्तव्यास असलेल्या बांगलादेशी नागरिकांवर कारवाई अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांची कामगिरी

दिनांक १३/११/२०२१ रोजी गुप्त बातमीदारामार्फत अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष भाईंदर यांना माहिती प्राप्त झाली की, नयानगर पोलीस ठाण्याच्या कार्यक्षेत्रात भारत पेट्रोल पंपाचे जवळ, गोंविद नगर परिसरात काही बांगलादेशी नागरिक अनधिकृतपणे वास्तव्य करत आहेत.

मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने पोलीस पथक, पंच व दुभाषिक यांचेसह वरील नमुद ठिकाणी छापा कारवाई करुन ०९ बांगलादेशी नागरिकांना ताब्यात घेवुन त्यांचेकडे विचारपूस केली असता, ते पारपत्र व व्हिसा शिवाय अनाधिकृतपणे वास्तव्य करीत असल्याचे निदर्शनास आल्याने त्यांच्यावर नयानगर पोलीस ठाणे गुन्हा रजि. क्र. ६३३/२०२१ भारतीय पासपोर्ट अधि. १९२० चे कलम ३ (अ), ६(अ) सह विदेशी अधिनियम १९४६ चे कलम १४ (अ) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदरची कामगिरी श्री. महेश पाटील, पोलीस उप आयुक्त, (गुन्हे), श्री. अमोल मांडवे सहा. पोलीस आयुक्त, (गुन्हे) यांचे मार्गदर्शनाखाली श्री. संपतराव पाटील, वरीष्ठ पोलीस निरीक्षक, पो.हवा.२२६९ उमेश पाटील, रामचंद्र पाटील, पो.ना. गावडे, पो.अं. केशव शिंदे, सुप्रिया तिवले, अनैतिक मानवी वाहतुक प्रतिबंध कक्ष, भाईंदर यांनी केली आहे.

----------oooo-----------